# मिरा-भाईंदर,वसई- विरार आयुक्तालय

विषय :- दिनांक- **२९/११/२०२२** रोर्जाचे पेपर कात्रणाबाबत.

१) गुन्हेगारी घटना २) कायदा व सुव्यवस्था ३) राजकीय घटना ४) इतर

| अ. क्र. | दिनांक | वर्तमान पत्राचे नांव | बातमीचा मथळा (Heading) | संबंधीत पो.ठाणे | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | २९.११.२०२२ | सामना पा. नं .०७ | खाकी वर्दीचे स्वप्न शहरातच पूर्ण होणार | मि.भा.व.वि. | |
| २. | २९.११.२०२२ | लोकमत पा. नं .०४ | झटका मारलेला आरोपी पोलीसांच्या जाळयात | वसई | |
| ३. | २९.११.२०२२ | पुढारी पा. नं .०१ | सक्तीचे धर्मांतर रोखण्यासाठी लवकरच कठोर कायदा | इतर | |
| ४. | २९.११.२०२२ | सामना पा. नं .०६ | मीरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील ७५ टक्के गुन्हयांची उकल | मि.भा.व.वि. | |
| ५. | २९.११.२०२२ | पुढारी पु. पा. ०३ | विनापरवानगी शूटींगवर पालिकेची दंडात्मक कारवाई | नवघर | |
| ६. | २९.११.२०२२ | पुढारी पु. पा. ०२ | मोबाईल चोरी करणा-या आरोपींना अटक | नवघर | |
| ७. | २९.११.२०२२ | पुण्यनगरी पु. पा. ०४ | मीरा-भाईंदर वसई-विरारमधील गुन्हे उघडकीस आणण्याच्या प्रमाणात होतेय वाढ | मि.भा.व.वि. | |
| ८. | २९.११.२०२२ | पुण्यनगरी पु. पा. ०१ | तरूणासाठी पोलीस बनून आले देवदूत | नवघर | |
| ९. | २९.११.२०२२ | सकाळ पु. पा. ०१ | भाजपा कार्यकर्त्यांना पोलिसांची नोटीस | मि.भा.व.वि. | |
| १०. | २९.११.२०२२ | पुण्यनगरी पु. पा. ०१ | बँक दरोडयातील फरार आरोपीसह साथीदाराला अखेर अटक | वसई | |
| ११. | २९.११.२०२२ | लोकसत्ता पु. पा. ०३ | भूमीपूजन कार्यक्रमात काळे झेंडे | मिरा-भाईंदर | |

सामना पा.नं. ८

लोकमत पा.नं.४

### मीरा रोड, वसई-विरारमधील तरुणांना सुवर्णसंधी

# खाकी वर्दीचे स्वप्न शहरातच पूर्ण होणार

## भाईंदरच्या सुभाषचंद्र बोस मैदानात पोलीस भरती

भाईंदर, दि. २८ (सा. वा.) - खाकी वर्दीचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी शहराबाहेर धाव घेणाऱ्या मीरा-भाईंदर, वसई-विरारमधील तरुणांना आता त्यांच्यात पोलीस आयक्तालय क्षेत्रात होणाऱ्या भरती प्रक्रियेत सहभागी होता येणार आहे. मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय सुरू झाल्यानंतर शहरात होणारी ही पहिलीच भरती प्रक्रिया असून भाईंदर पश्चिमेच्या सुभाषचंद्र बोस मैदानावर होणारी ही भरती पारदर्शकपणे पार पाडण्याकरिता प्रत्येक स्तरावर विशेष उपाययोजना करण्यात येणार आहेत.



मीरा-भाईंदर व वसई-विरार पोलीस आयुक्तालयाला २ वर्षे पूर्ण झाली असून येथील मंजूर मनुष्यबळापेक्षा एक हजार पोलीस अंमलदारांची पदे रिक्त असल्याने कायदा-सुव्यवस्था राखताना पोलीस दलाची दमछाक होत असे. मात्र नवीन पोलीस भरतीमुळे आयुक्तालयातील पोलीस दलामध्ये ९९६ पोलीस अंमलदारांची भर पडणार आहे. त्यामुळे शहरातील पोलीस दलाची ताकद वाढणार आहे. याआधी मीरा रोड, भाईंदर, वसई-विरार भागातील तरुण-तरुणींना पोलीस भरतीसाठी शहराबाहेरील इतर पोलीस आयुक्तालय क्षेत्रात धाव घ्यावी लागत होती. मात्र आता पोलिसांत भरती होण्याचे स्वप्न उराशी बाळगणाऱ्या तरुणांना दुसऱ्या शहरात भरती करता जावे लागणार नसल्याने त्यांच्या आत्मविश्वासात भर पडणार आहे.

### ९९६ पोलीस शिपाई पदांकरिता पोलीस भरती

राज्यातील सर्व जिल्हा पोलीस दल व आयुक्तालयामध्ये पोलीस शिपाई पदांची भरती प्रक्रिया राबवण्यात येणार असून मीरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयामध्येदेखील ९९६ पोलीस शिपाई पदांकरिता पोलीस भरती प्रक्रिया राबवण्यात येणार आहे. या भरतीमध्ये ९८६ पोलीस शिपाई व १० चालक शिपाई पदांची भरती करण्यात येणार आहे.

---

# झटका मारलेला आरोपी पोलिसांच्या जाळ्यात

### साथीदारासह पोलिसांनी केले जेरबंद

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : विरारच्या आयसीआयसीआय बँकेच्या खून व दरोड्याच्या प्रकरणातील आरोपी शुक्रवारी दुपारी वसई न्यायालयातून पोलिसांच्या हाताला झटका मारून मित्राच्या मदतीने दुचाकीवरून फरार झाला होता. याप्रकरणी गुन्हे शाखेच्या युनिट-३च्या पोलिस अधिकारी व अंमलदारांनी तपास करून फरार आरोपीला मित्रासोबत रविवारी रात्री अटक केली. पळून जाण्यासाठी वापरलेली दुचाकीही पोलिसांनी जप्त केली आहे.

विरारच्या आयसीआयसीआय बँकेत २९ जुलै २०२१ मध्ये रात्री आठच्या सुमारास आरोपी अनिल दुबेने जबरी चोरीच्या इराद्याने धारधार हत्यारानिशी व्यवस्थापक योगिता चौधरी यांना गळ्यावर वार करत जीवे मारले होते. तसेच चोरीला विरोध करणाऱ्या रोखपाल श्रद्धा देवरुखकर यांच्यावरही वार करून जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला होता. याप्रकरणी विरार पोलिसांनी हत्या आणि दरोड्याचा गुन्हा दाखल करून आरोपीला अटक केली होती. आरोपी अनिल हा तेव्हापासून ठाणे मध्यवर्ती कारागृहात आहे.

शुक्रवारी आरोपीला ठाणे जेलमधून वसई न्यायालयात आणण्यात आले होते. आरोपीला बाथरूमला नेण्यात आल्यावर एका सहायक पोलिस उपनिरीक्षकाचा हात झटकून तो न्यायालयाच्या परिसरातून पळून गेला होता.

**ठाणे मध्यवर्ती कारागृहात आखला होता प्लान**

अनिल व चांद हे दोघेही ठाणे मध्यवर्ती कारागृहात शिक्षा भोगत असताना ओळख झाली होती. अनिलने चांद याला पळून जाण्यासाठी मदत केल्यावर पैसे देतो, असे सांगितले होते. चांद याने त्याला होकार देत सुटल्यावर वसईत आल्यावर पळून जाण्याचा प्लान आखण्यात आला होता. ठरल्याप्रमाणे शुक्रवारी त्यांनी हा प्लान फत्ते केला होता.

> वरिष्ठांच्या आदेशानुसार शोधासाठी पथके तयार करून माहिती मिळाल्यावर आरोपी व त्याला पळून जाण्यासाठी मदत करणारा अशा दोघांना रविवारी रात्री अटक केली आहे.
>
> \- प्रमोद बडाख, पोलिस निरीक्षक, गुन्हे युनिट-३

पुढारी पा. नं. ७.

# सक्तीचे धर्मांतर रोखण्यासाठी लवकरच कठोर कायदा

## केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात दाखल केले प्रतिज्ञापत्र

**नवी दिल्ली : पुढारी वृत्तसेवा**

सक्तीने केली जाणारी धर्मांतरे रोखण्यासंदर्भात केंद्र सरकारने सोमवारी सर्वोच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र दाखल केले. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता बळजबरीने केली जाणारी धर्मांतरे रोखण्यासाठी लवकरच कायदा बनवण्यात येईल, अशी माहिती सरकारने सोमवारी प्रतिज्ञापत्राद्वारे न्यायालयात सादर केली. फसवणूक, प्रलोभन तसेच इतर कोणत्याही माध्यमातून कुठल्याही व्यक्तीचे धर्मपरिवर्तन करणे, असा धार्मिक स्वातंत्र्याचा अर्थ होत नाही, असेदेखील सरकारने प्रतिज्ञापत्रातून स्पष्ट केले आहे.

सक्तीची धर्मांतरे रोखण्यासाठी ओडिशा, मध्य प्रदेश, गुजरात, छत्तीसगड, झारखंड, उत्तराखंड, उत्तर प्रदेश, कर्नाटक आणि हरियाणा या नऊ राज्यांत कायदा करण्यात आला आहे. महिला तसेच आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या दुर्बल वर्गांच्या अधिकारांचे संरक्षण करण्यासाठी या कायद्याची आत्यंतिक गरज असल्याचे मत केंद्राने प्रतिज्ञापत्रात व्यक्त केले.

सक्तीने करण्यात येणाऱ्या धर्मांतराविरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करून ज्येष्ठ वकील अश्विनी उपाध्याय यांनी यासंदर्भात कायदा बनवण्याची मागणी केली होती. अंधश्रद्धा, चमत्कार, जादूटोणा इत्यादीच्या माध्यमातून बळजबरीने धर्मांतरे करण्याच्या घटना दर आठवड्याला समोर येत असून, सक्तीची धर्मांतरे रोखण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारांनी कठोर पावले उचलण्याची आवश्यकता असल्याची विनंती या याचिकेत करण्यात आली.

**सर्वोच्च न्यायालयाचीही चिंता**

फसवणूक आणि धमकी देऊनही देशात धर्मांतरे केली जात असल्याचा दावा याचिकेद्वारे करण्यात आला आहे. या प्रकरणावर १४ नोव्हेंबरला सुनावणी घेऊन देशात प्रत्येकाला धार्मिक स्वातंत्र्य आहे. तथापि, बळजबरीने धर्मांतर करण्याचे कुठलेही स्वातंत्र्य नाही, असे स्पष्ट मत न्यायालयाने नोंदवले होते. भारतीय राज्यघटनेनुसार धर्मांतर कायदेशीर आहे. मात्र, कोणत्याही स्थितीत ते सक्तीने केले जाऊ शकत नाही, असे सांगून सर्वोच्च न्यायालयाने केंद्राला नोटीस बजावली होती.

### सक्तीचे धर्मांतर म्हणजे देशाच्या सुरक्षेला धोका

याआधी झालेल्या सुनावणीत सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने सक्तीचे धर्मांतर म्हणजे देशाच्या सुरक्षेला धोका असल्याचे महत्त्वपूर्ण निरीक्षण न्यायमूर्ती एन. आर. शहा आणि न्यायमूर्ती हिमा कोहली यांच्या खंडपीठाने नोंदवले होते. न्यायालयाने याबाबतीत नेमकी कोणती पावले उचलावीत, हेही केंद्र सरकारने आम्हाला सांगावे, असेही खंडपीठाने तेव्हा म्हटले होते. आता हा मुद्दा नव्याने ऐरणीवर आला आहे.

# मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील ७५ टक्के गुन्ह्यांची उकल



## पोलीस आयुक्त सदानंद दाते यांच्या अॅक्शन प्लॅनला यश

← सामना पा. नं. ६.

भाईंदर, दि. २८ (सा.वा.) - अवघ्या दोन वर्षांपूर्वी सुरू झालेल्या मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील ७५ टक्के गुन्ह्यांची उकल झाली आहे. शहरातील गुन्हेगारीवर अंकुश मिळवण्यासाठी पोलीस आयुक्त सदानंद दाते यांनी आखलेल्या अॅक्शन प्लॅनमुळे पोलिसांना गुन्ह्यांची उकल करण्यात यश आले आहे. विशेष म्हणजे वेगवान तपास करत गुन्हे उघडकीस आणणाऱ्या [illegible] पोलीस ठाण्यांच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकांना आयुक्त दाते यांच्या हस्ते सन्मानित केले जाते. त्यामुळे शहरातील 'खाकी वर्दी'ला बळ मिळत आहे.


मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील सर्व पोलीस अधिकारी व अंमलदारांची पोलीस आयुक्त सदानंद दाते प्रत्येक महिन्याला आढावा बैठक घेतात. आयुक्तालयात २०२१ या वर्षात दाखल गुन्ह्यांचे प्रमाण ६ हजार १०८ तर उघड गुन्ह्यांचे प्रमाण ४ हजार ७२१ इतके आहे. या वर्षात ६ हजार ९३२ गुन्हे दाखल झाले असून त्यापैकी ५ हजार १९४ गुन्ह्यांची उकल झाली.

### पाच पोलीस ठाण्यांची नेत्रदीपक कामगिरी

उत्तन, काशिमीरा, मीरा रोड, नवघर, पेल्हार या पाच पोलीस ठाण्यांच्या हद्दीत गुन्हा उघडकीस आणण्याचे प्रमाण ८० टक्क्यांहून अधिक आहे. यासोबतच भाईंदर, नयानगर, वसई, माणिकपूर, तुळींज, वालीव, आचोले, विरार, मांडवी, नालासोपारा, अर्नाळा या पोलीस ठाण्यांच्या हद्दीतही गुन्हा उघडकीस आणण्याचे प्रमाण ७० ते ७५ टक्क्यांहून जास्त आहे.

पुढारी पृ. पा-३.

# विनापरवानगी शूटिंगवर पालिकेची दंडात्मक कारवाई



## २ लाख ९५ हजारांचा दंड वसूल

पालिकेने काही दिवसांपूर्वी विनापरवानगी शूटिंग करणाऱ्या दोन कंपन्यांवर दंडात्मक कारवाई केली असतानाच पालिकेचे टाळेबंद असलेल्या भाईंदर पूर्वेकडील लोकनेते स्व. गोपीनाथ मुंडे क्रीडासंकुलात असलेल्या राजूज् किचन या हॉटेलमध्ये २५ नोव्हेंबर रोजी विनापरवानगी शूटिंग सुरु असल्याची तक्रार स्थानिक रहिवासी अनिल नौटियाल यांनी मिळकत विभागाकडे केली. त्याची दखल घेत मिळकत विभागाचे शहर अभियंता दीपक खांबित यांच्या आदेशानुसार लिपिक संजय म्हात्रे यांनी विनापरवानगी शूटिंग केल्याप्रकरणी हॉटेलवर दंडात्मक कारवाई करून एकूण २ लाख ९५ हजारांचा दंड वसूल केला.

**भाईंदर : पुढारी वृत्तसेवा**

मिरा-भाईंदर महापालिकेचे भाईंदर पूर्वेस लोकनेते स्व. गोपीनाथ मुंडे क्रीडासंकुलाच्या परिचलनाची मुदत संपुष्टात आल्याने ते सध्या टाळेबंद आहे. असे असतानाही त्यातील राजूज् किचन या हॉटेलमध्ये पालिकेची कोणतीही परवानगी न घेता दोन दिवसांपूर्वी शूटिंग करण्यात आली होती. त्याची तक्रार प्राप्त होताच पालिकेने विनापरवानगी हॉटेलमध्ये शूटिंग केल्याप्रकरणी हॉटेलवर दंडात्मक कारवाई करून २ लाख ९५ हजार रुपयांचा दंड वसूल केला.

पालिका क्षेत्रात मराठी, हिंदी आदी चित्रपट व मालिकांचे चित्रीकरण मोठ्याप्रमाणात केले जाते. काशिमीरा व घोडबंदर भागांमध्ये चित्रीकरणांचे स्टुडिओ मोठ्याप्रमाणात आहेत. यासह काही ठिकाणी तर काही ठिकाणच्या रस्त्यांवर अनेकदा शूटिंग केले जाते. अनेकदा हे शूटिंग पालिका तसेच पोलीस व वाहतूक शाखेच्या परवानगी खेरीज केले जाते. पालिकेच्या तत्कालीन महासभेत शहरात होणाऱ्या शुटिंगचे दर प्रतिदिवस सुमारे २५ हजार रुपये इतके निश्चित करण्यात आले आहेत. त्याला बगल देत अनेक शूटिंग कंपन्या अनेकदा विनापरवानगी शूटिंग करतात. त्याची तारकार प्राप्त होताच पालिकेकडून दहापट दंडात्मक कारवाई केली जाते. तर पोलीस व वाहतूक शाखेकडून गुन्हा दाखल केला जातो.

पुढारी पा.नं.२.

# मोबाईल चोरी करणाऱ्या आरोपींना अटक

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

नवघर पोलीस ठाणे हद्दीत मोबाईल फोन चोरी करणाऱ्या दोन आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांच्याकडून ८ मोबाईल व गुन्ह्यात वापरलेली दुचाकी जप्त करण्यात आली आहे. राजकुमार प्यारेलाल शुक्ला वय ४६ वर्षे रा- भाईंदर पूर्व हे त्यांच्या फर्निशिंगचा व्यवसाय असलेल्या दुकानात असतांना त्यांनी त्यांचा मोबाईल फोन हा चार्जिंगसाठी लावला असताना एक अनोळखी व्यक्ती त्यांच्या दुकानात आला व चार्जिंगसाठी ठेवलेला मोबाईल चोरी करुन घेवुन जात असताना शुक्ला यांनी त्याला पकडले व पोलीस ठाणेस घेवून आले. त्यानंतर त्यांनी चोरी करणारा वरुण सुनिल राणे ,याच्या विरोधात नवघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. त्या गुन्ह्याचा तपास करून नवघर पोलिसांनी आरोपीला २६ नोव्हेंबर रोजी अटक केली.

पोलीस कस्टडीमध्ये तपास केला असता त्याने मिरा-भाईंदर परिसरात वेगवेगळ्या कंपनीचे एकूण १० मोबाईल फोन चोरी केले असल्याचे सांगितले. त्यातील ६ मोबाईल फोन ३९, ५०० रुपयांचे ६ मोबाईल फोन जप्त करण्यात आले असून पुढील तपास सुरेश चव्हाण हे करत आहे. त्याचप्रमाणे शितल अमरजित जैस्वाल या २५ नोव्हेंबर रोजी लोकमान्य विद्यालय, नवघर रोड येथून त्यांच्या घरी जात होत्या. त्यावेळी त्या फोनवर बोलत जात होत्या. त्यावेळी त्यांच्या पाठीमागुन दोन अनोळखी व्यक्ती दुचाकी वरून आले व त्यांनी शितल यांच्या हातातील मोबाईल फोन खेचुन पळून गेले. त्याबाबत नवघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्हयातील आरोपीचा पोलिसांनी तपास करून आरोपी ओम विक्रम सोळंके याला या गुन्हयात अटक करुन त्यांच्याकडे पोलीस कस्टडी मध्ये तपास केला असता त्याने चोरी केलेला मोबाईल फोन व इतर १ असे दोन मोबाईल फोन व गुन्हयात वापरलेली दुचाकी असा ६०,००० चा जप्त केला आहे. या गुन्हयाचा पुढील तपास पोउनि अभिजित लांडे हे करत आहे.

पुण्यनगरी पृ.पा.४

# मीरा-भाईंदर, वसई-विरारमधील गुन्हे उघडकीस आणण्याच्या प्रमाणात होतेय वाढ

**। मीरा रोड** : मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय सुरू होऊन दोन वर्ष झाली आहेत. पोलीस आयुक्तालय सुरू झाल्यापासून गुन्हे उघडकीस आणण्याचे प्रमाण वाढले आहे. आयुक्तालय हद्दीतील सर्व पोलीस ठाण्यांचे गुन्हे उघडकीस आणण्याचे प्रमाण ७५ टक्क्यांवर पोहोचले आहे.

मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय स्थापन झाल्यानंतर पोलीस आयुक्त म्हणून सदानंद दाते यांची नियुक्ती करण्यात आली. त्यांची नियुक्ती झाल्यानंतर गुन्हे दाखल होण्याचे प्रमाण वाढले. त्याचबरोबर ते गुन्हे उघडकीस आणण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. त्यामुळे गुन्हेगारी प्रवृत्तीस आळा बसला आहे. पोलीस आयुक्तालय हद्दीत १६ पोलीस ठाणी येत असून सर्व पोलीस ठाण्यांतील गुन्हे उघडकीस आणण्याचे प्रमाण ७५ टक्के झाले आहे. पोलीस आयुक्तालयाच्या अंतर्गत उत्तम कामगिरी करणारे सर्व पोलीस अधिकारी व अमलदार यांना आयुक्तालयात प्रत्येक महिन्यात होणाऱ्या आढावा बैठकीत सन्मानित करण्यात येते. मीरा-भाईंदर, वसई-विरार शहरातील गुन्ह्याचा उत्कृष्ट तपास केल्यामुळे अनेक पोलीस ठाण्यांच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांना पोलीस आयुक्त सदानंद दाते यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले आहे.



मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयात २०२१ या वर्षात दाखल गुन्ह्यांचे प्रमाण ६,१०८, तर उघड गुन्हे ४,७२१ इतके आहेत. मात्र २०२२ या वर्षात ६,९३२ गुन्हे दाखल असून त्यापैकी ५,१९४ गुन्हे उघडकीस आणण्यात आले आहेत. आयुक्तालयाच्या हद्दीतील १६ पोलीस ठाण्यांमध्ये ऑक्टोबर २०२२ अखेरपर्यंत उघड गुन्ह्यांचे प्रमाण ७५ टक्के आहे. मीरा रोड ८१, काशिमीरा ८३, भाईंदर ७६, उत्तन ८६, नवघर ८०, नयानगर ७४, वसई ७९, माणिकपूर ६९, तुळिंज ७८, वालीव ६९, आचोले ७१, विरार ६७, पेल्हार ८०, मांडवी ६५, नालासोपारा ७५, अर्नाळा ७९ प्रत्येक पोलीस ठाण्याची टक्केवारी अशा प्रकारची आहे. आयुक्तालयातील १६ पोलीस ठाण्यांपैकी उत्तन, काशिमीरा, मीरा रोड, नवघर, पेल्हार या पाच पोलीस ठाण्यांची गुन्हे उघडकीस आणण्याची टक्केवारी ८० पेक्षा जास्त आहे.

---

पुण्यनगरी पृ.पा.१.

## तरुणासाठी पोलीस बनून आले देवदूत

**। मीरा रोड** : भाईंदर खाडीमध्ये रेल्वे पुलावरून उडी मारून तरुणाने जीवन यात्रा संपवण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांनी तत्काळ तेथे पोहोचून त्याला पाण्याबाहेर काढून त्याचा जीव वाचवला. पोलीस या तरुणासाठी देवदूतच बनून आले आणि त्याचा जीव वाचवला. भाईंदर पूर्वेच्या जेसल पार्क खाडी येथे प्रदीप उदयराज उपाध्याय तरुणाने आत्महत्या करण्यासाठी भाईंदर खाडीमध्ये रेल्वे पुलावरून उडी मारली होती. बिट मार्शल क्र. १ चे पोलीस अंमलदार भोये तसेच गोतरणे यांना नियंत्रण कक्षाकडून माहिती मिळताच सागरी गस्तीवर असलेले भाईंदर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक शिरसाट, कोडे तसेच सागरी सुरक्षा शाखेचे जुनेरे यांच्या मदतीने स्पीड बोटीच्या सहाय्याने या ठिकाणी जाऊन उडी मारणाऱ्या तरुणाला भाईंदर खाडीमधून सुखरूप बाहेर काढले आणि त्याच्या भावाच्या ताब्यात दिले.

सकाळ ५.५१-१.

# भाजप कार्यकर्त्यांना पोलिसांची नोटीस

## कोविड काळातील आंदोलनप्रकरणी न्यायालयात दोषारोपपत्र

भाईंदर, ता. २८ (बातमीदार) : कोविड काळात झालेल्या विविध जनआंदोलनात दाखल झालेले गुन्हे मागे घेण्याविषयीचे आदेश मुख्यमंत्र्यांनी याआधीच दिले आहेत. असे असताना मिरा-भाईंदरमधील पाणी टंचाई विरोधात भाजपने कोविड काळात केलेल्या आंदोलन प्रकरणातील गुन्ह्यांसंदर्भातील दोषारोप पत्र पोलिसांकडून न्यायालयात सादर करण्यात आले आहे. याप्रकरणी गुन्हा दाखल झालेल्या भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांना पोलिसांकडून नोटिसादेखील पाठवल्या आहेत.

**» पत्र उशीराने प्राप्त**

दोषारोपपत्र न्यायालयात सादर करण्याची तारीख १६ नोव्हेंबर असताना भाजप कार्यकर्त्यांना पोलिस ठाण्यांकडून न्यायालयात हजर राहाण्यासंदर्भात पाठविण्यात आलेली पत्रे त्यानंतर म्हणजे २४-२५ नोव्हेंबरला प्राप्त झाली आहेत, अशी माहिती माजी सभागृह नेते प्रशांत दळवी यांनी दिली.

दाखल झालेल्या गुन्ह्याप्रकरणी पोलिसांनी प्रक्रियेनुसार ही कार्यवाही केली आहे. मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या आदेशानुसार कोविड काळात जी आंदोलने झाली आहेत त्याचा अहवाल शासनाने नेमलेल्या समितीकडे पाठवण्यात आला आहे. त्यात या आंदोलनाचाही समावेश आहे. त्यावर शासन व न्यायालय योग्य तो निर्णय घेईल.

- संजय हजारे, वरिष्ठ पोलिस निरिक्षक

गेल्यावर्षी सप्टेंबर व ऑक्टोबर महिन्यात मिरा-भाईंदरमध्ये तीव्र पाणी टंचाई निर्माण झाली होती. या पाणीटंचाई विरोधात मिरा-भाईंदर भाजपकडून आंदोलन करण्यात आले होते. मिरा-भाईंदरला स्टेम आणि एमआयडीसीकडून पाणी पुरवठा केला जातो. मात्र एमआयडीसीकडून मंजूर कोट्यापेक्षा पाणी कमी दिले जाते. तसेच एमआयडीसीच्या जुन्या जलवाहिन्या वारंवार फुटत आहेत. त्यामुळे शहरात कृत्रिम पाणी टंचाई निर्माण होत आहे, असा आरोप भाजपकडून करण्यात आला होता. यावेळी मिरा रोड येथील सिल्वर पार्क परिसरात भाजपचे शेकडो कार्यकर्ते जमा होऊन त्यांनी आंदोलन केले होते. तसेच महापालिका मुख्यालयातही मटका फोडो आंदोलन केले होते. या आंदोलनात माजी आमदार नरेंद्र मेहता, तत्कालीन महापौर ज्योत्स्ना हसनाळे, उपमहापौर हसमुख गेहलोत, सभागृह नेते प्रशांत दळवी यांच्यासह भाजपचे नगरसेवक, पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.

याप्रकरणी या सर्वांवर काशीमिरा पोलिस ठाण्यात आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, महाराष्ट्र कोविड-१९ अधिनियम, पर्यावरण संरक्षण अधिनियम यासह विविध कलमांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले होते. त्यानंतर या सर्वांना न्यायालयातून अटकपूर्व जामीनदेखील मिळाला होता. दरम्यान राज्यात सत्ताबदल झाल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कोविड काळात झालेल्या विविध जनआंदोलनात दाखल झालेले गुन्हे मागे घेण्याचे आदेश दिले होते. असे असताना पाणीटंचाई आंदोलनात दाखल झालेल्या गुन्ह्यांच्या प्रकरणी भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांना काशीमिरा पोलिस ठाण्याकडून नुकतेच पत्र पाठवण्यात आले आहे. आंदोलनप्रकरणी न्यायालयात १६ नोव्हेंबरला दोषारोप पत्र दाखल करण्यात येत असून यावेळी न्यायालयात हजर राहावे असे, या पत्रात नमूद करण्यात आले आहे.

पुण्यनगरी ५-५१-१

# बँक दरोड्यातील फरार आरोपीसह साथीदाराला अखेर अटक

**वसई** : वसई न्यायालयात आणताना पोलिसांच्या तावडीतून फरार झालेला बँक दरोडा आणि हत्या प्रकरणातील आरोपी अनिल दुबे याला गुन्हे शाखा ३ च्या पथकाने वसईतून अटक केली.तर दुबे याला पळून जाण्यास मदत करणाऱ्या चांद मेहबूब खान या आरोपीला देखील अटक करण्यात आली आहे.



मागील वर्षी जुलै महिन्यात विरारच्या आयसीआयसीआय बँकेवर दरोडा पडला होता. याच बँकेचा माजी व्यवस्थापक असलेल्या अनिल दुबे याने बँकेत दरोडा घालून तीन कोटी लुटले होते. यावेळी त्याने केलेल्या हल्ल्यात बँकेच्या महिला व्यवस्थापक योगिता वर्तक-चौधरी यांचा मृत्यू झाला, तर श्रद्धा देवरुखकर या जखमी झाल्या होत्या. तेव्हापासून तो न्यायालयीन कोठडीत होता. शुक्रवारी दुपारी त्याला वसई न्यायालयात आणले असताना पोलिसांना चकमा देऊन तो पळून गेला होता. या प्रकरणाचा तपास करून गुन्हे शाखा तीनच्या पथकाचे प्रमुख प्रमोद बडाख यांनी त्याला वसईतून अटक केली, तर त्याचा साथीदार चांद खान याला नालासोपाऱ्यातून अटक केली.

लोकसत्ता ५-५-२०

# भूमिपूजन कार्यक्रमात काळे झेंडे

## महाराष्ट्र एकीकरण समितीचे १२ कार्यकर्ते पोलिसांच्या ताब्यात

लोकसत्ता वार्ताहर

**भाईंदर :** मीरा रोड येथे उभारल्या जाणाऱ्या ठाणे जिल्ह्यातील पहिल्या हिंदी भाषिक भवनाच्या भूमिपूजनाचा कार्यक्रमाच्या महाराष्ट्र एकीकरण समितीच्या कार्यकर्त्यांनी काळे झेंडे दाखवले. यावेळी विरोध करणाऱ्या मराठी एकीकरण समितीच्या १२ कार्यकर्त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले.

मीरा-भाईंदर शहरातील वाढती अमराठी भाषिक नागरिकांची संख्या लक्षात घेता, शहरात एक हिंदी भाषिक भवन उभारले जावे, अशी मागणी स्थानिक आमदार प्रताप सरनाईक यांनी केली होती. त्यानुसार मीरा रोड येथील जे. पी इन्फ्रा परिसरात पालिकेकडून सुविधा भूखंडावर विकासकाला विकास हक्क प्रमाणपत्र देऊन 'हरिवंश राय बच्चन' या हिंदी भाषिक भवनाची निर्मिती केली जाणार आहे. रविवारी या भवनाच्या भूमिपूजनाचा कार्यक्रम झाला.

या वेळी उत्तर प्रदेश राज्याचे मंत्री स्वतंत्र देव सिंग हे मुख्य उदघाटक म्हणून उपस्थित होते. त्याच वेळी आयुक्त दिलीप ढोले, माजी राज्य गृहमंत्री कृपा शंकरसिंह, भाजप जिल्हाध्यक्ष रवि व्यास आणि माजी नगरसेवक विक्रम प्रताप सिंग यांचीही उपस्थिती होती.



महाराष्ट्र एकीकरण समितीच्या कार्यकर्त्यांनी आंदोलन पुकारले होते.

### भवन असे...

मीरा रोड येथे उभारले जाणारे हे हिंदी भाषिक भवन ठाणे जिल्ह्यातील पहिले भवन ठरणार आहे.साधारण १० हजार चौरस मीटर पसरलेल्या या जागेत प्रथम टप्प्यात तीन मजले उभारले जाणार आहेत.या तीन मजल्यामधील पहिल्या दोन मजल्यावर कार्यक्रम करण्यासाठी विशेष सभागृह उभारले जाणार आहे. तर उर्वरित राहिलेल्या तिसऱ्या मजल्यावर ह्यपरिषद सभागृहाची निर्मिती केली जाणार आहे.यात विविध राज्यातून आलेल्या हिंदी भाषिक नागरिकांना साहित्यिक कार्यक्रम आयोजित करण्याची संधी दिली जाणार आहे.तसेच येत्या १८ महिन्यात या भवनाची निर्मिती पूर्ण होणार असल्याची माहिती पालिकेचे आयुक्त दिलीप ढोले यांनी दिली.

**हिंदी भाषिक मूळ महाराष्ट्रीच**

शहरात मराठी भाषा भवन नाही. परंतु, थेट हिंदी भाषिक भवन उभारले जात आहे. त्यामुळे कार्यक्रमाला मराठी एकीकरण समितीने काळे झेंडे दाखवले. समितीच्या या आंदोलनामुळे कार्यक्रमस्थळी काही काळ तणाव पसरला. पोलिसांनी १२ कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले. तर येथे हिंदी भाषा भवनांची निर्मिती होत असली तरी येथील हिंदी भाषिक हे मूळ महाराष्ट्रातले आहेत. या गोष्टीला अकारण राजकीय वळण दिले जात असल्याचे मत राजकीय पुढाऱ्यांनी व्यक्त केले.